## मराठी-वाङ्मय-मंडळ
## ‘मराठी भाषा-संवर्धन पंधरवडा’
## अहवाल
## (शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३)

**'प्रवास रानमाणसाचा'**

२०२२-२३ ह्या शैक्षणिक वर्षातील मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी पार पडला. 'प्रवास रानमाणसाचा' ह्या कार्यक्रमात पर्यावरणस्नेही शाश्वत जीवनशैलीचे प्रसारक श्री. प्रसाद गावडे यांची मुलाखत घेण्यात आली. श्री. प्रसाद गावडे ह्यांचा एकंदर जीवनप्रवास, कोकणी माणूस, कोकणी त्याची संस्कृती, कोकणातला निसर्ग आणि साहित्य याविषयी प्रसाद यांनी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी आपल्या विचारांच्या प्रसारासाठी सोशल मिडियाचा केलेला वापर विद्यार्थ्यांना प्रसारमाध्यमांच्या वापराविषयी मूल्यदृष्टी देणारा होता.उत्कृष्ट संवादशैली आणि समृद्ध जीवनानुभव तसेच सामाजिक भान या त्रिसूत्रींचा मेळ या गप्पांमधून साधला गेला. प्रश्नोत्तर सत्रालाही प्रेक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिला. मुलाखतीच्या शेवटी ‘इको टुरिजम’ ह्या विषयावर त्यांनी संगणकीय सादरीकरण केले.

**‘मराठी भाषा-संवर्धन पंधरवडा’**

१४ जानेवारी, २०२३ रोजी महर्षी दयानंद महाविद्यालयासहित रुपारेल महाविद्यालयाने सहभागी होत 'दास्तांगोई' ह्या प्रयोगाचे आयोजन केले होते. १६ जानेवारी, २०२३ रोजी रुपारेल महाविद्यालयात ग्रंथप्रदर्शन व दिवाळी अंकविषयक भित्तीपत्रक प्रदर्शनाचे आयोजन केले होते. १७ जानेवारी, २०२३ रोजी प्रा. अविनाश कोल्हे यांच्या मार्गदर्शनाद्वारे कथालेखन कार्यशाळा पार पडली. २० जानेवारी, २०२३ रोजी प्रा. अजिंक्य गायकवाड यांचे 'साहित्य आणि राजकारण' ह्या विषयावर व्याख्यान आणि २१ जानेवारी, २०२३ रोजी श्री.मुकुंद कुळे ह्यांचे 'मराठीतील व्यावसायिक संधी' ह्यावर आधारित व्याखान आयोजित केले होते. २४,

२५, आणि २८ जानेवारी, २०२३ रोजी अनुक्रमे 'बोलींच्या गावाला जाऊ या !', 'हे शटर बंद का होत नाही?!' आणि ‘मी कविता तू अर्थ’ हे कार्यक्रम प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष मराठी वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्व कार्यक्रमांना रुपारेलमधील विद्यार्थ्यांनी उदंड प्रतिसाद दिला.

**मराठी भाषा गौरव दिन**

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त २७ फेब्रुवारी रोजी ग्रंथदिंडीचे आयोजन केले होते. ही विवेकाची दिंडी मानवताधर्माला आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ह्या संविधानिक मूल्यांना पुरस्कृत करणारी होती. ह्या विचाराने निवडलेली पुस्तके पालखीत समाविष्ट होती. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लेझीम संचलन आणि अभंग, प्रार्थना ह्यांमध्ये सहभाग घेतला. अनेक विभागांचे प्राध्यापकही ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते. शिवाय ह्यानंतर सभागृहात काही प्राध्यापकांनी कुसुमाग्रजांच्या साहित्याचे अभिवाचन-काव्यवाचन केले. कुसुमाग्रजांच्या आठवणी जागवल्या गेल्या. तसेच महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्राध्यापकांनी 'मराठी भाषेचे शिक्षण आणि विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास' ह्यावर मुक्तपणे संवाद-चर्चा केली. चर्चेत इतिहासाच्या प्राध्यापक डॉ. मंजुषा पाटील, माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. मंदार भावे, वाणिज्यचे विभागप्रमुख डॉ. रवींद्र नेटावटे, प्रशासकीय कामांबाबत शिक्षकेतर कर्मचारी श्री. पवार आणि महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. दिलीप मस्के सहभागी झाले होते. मराठी आणि इतर क्षेत्रे ह्यांच्या समन्वयनाबाबत येथे चर्चा झाली.

**डॉ. वैशाली जावळेकर**
**मराठी विभागप्रमुख**